॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242 E-mail: approval@srtmun.ac.in

website: srtmun.ac.in approvalsrtmun@gmail.com

## परिपत्रक

प्रति,

**मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य**

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांच्या कायम मान्यते बाबत.**

**संदर्भ :** १) विद्यापीठ अनुदान आयोग, नवि दिल्ली यांचे विनियम २०१०/२०१८

२) प्रस्तुत विद्यापीठाचे परिनियम S.176

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. शैक्ष/मान्यता/०२/२०१९–२०२०/३९४४ दिनांक ०८ जुन २०२०

४) दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी आयोजित मा. अधिसभा बैठकीतील ठराव.

५) विद्यापीठाचे परिनियम S.176

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सर्व संबंधीतांनाा या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाविद्यालयात नियमित प्रक्रिया होऊन सेवेत असलेले परिविक्षाधीन कालावधीवरील कार्यरत असलेल्या शिक्षकांना त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्यानंतर संस्थेने संबंधितांना प्रस्तुत विद्यापिठाचे परिनियम S.176 नुसार कायम करणे बाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण करणाऱ्या शिक्षकास सेवेत कायम करण्याची कार्यवाही परिनियमातील तरतुदीनुसार संस्थेकडुन पुर्ण करावी, अन्यथा संबंधीत शिक्षक विद्यापीठ परिनियम S.176(4)(c) नुसार सेवेत कायम असल्याचे (Deemed to be Confirm) गृहीत राहील असे दिनांक ०४/०२/२०१९ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

मा. अधिसभा बैंठक दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे. संस्थेने प्राचार्य/शिक्षकांच्या परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण झाल्यानंतर संबंधीत शिक्षकांना परिनियमातील तरतुदीनुसार कायम (Confirm) करून संबंधीतांचे प्रस्ताव पुर्वीप्रमाणे विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत. सदर प्रस्ताव नियमानुसार बरोबर असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. कृपया सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

'ज्ञानतीर्थ' )(

विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ )(

जा.क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०२५–२६/415 )(

दिनांक : २३/०८/२०२५ )(

उपकुलसचिव

शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड.

२) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

४) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.